MHLA160000262024

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.०३/२०२४**
**शासन वि. बालाजी**

:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. पोलीस ठाणे देवणी यांनी सदर प्रकरण हे महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ कलम ६५–ई च्या गुन्ह्याकरिता दि.२०/०१/२०२४ रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. त्यामुळे आरोपीला समन्स बजावणी झालेली नाही. पोलिसांनी आरोपी मिळून न आल्याने समन्स विनातामील परत केलेले आहेत. भविष्यामध्ये सुध्दा सदर समन्सची बजावणी होऊन आरोपी हजर होण्याची शक्यता दिसून येत नाही. अभियोग पक्षाचा कसूर स्थापित झाला. त्यामुळे सदर प्रकरण गुणवत्तेवर सुध्दा अभियोग पक्षाच्या बाजुने निकाली काढता येणार नाही. तसेच फक्त रासायणीक परिक्षणाचा अहवाल हा उपरोक्त गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा असणार नाही. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मुद्देमाल नियमाप्रमाणे नष्ट करावा.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:31:52 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – १३–०३–२०२६**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**